बीड । सोमवार
१६.०६.२०२५
वर्षे : ५ अंक : ७६
किंमत : ३ रू. पाने : ४

दैनिक ● www.marathwadapatra.com

# मराठवाडा पत्र

■ संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे ■

dailymarathwadapatra2021@gmail.com RNI:Reg.NO.MAH/MAR/2021/80074 Post:Reg.No.L/226/RNP/Renewal/2025-2027 Mob:9822152955 पान:१







## शिक्षणाधिकारी फुलारी यांचा कारभार म्हणजे मला पहा आणि पाने फुले वाहा

### हजरत मन्सूर शाह' शाळेची चौकशी सुट्ट्यामध्ये गटविकास अधिकारी समंदर खान, शिक्षण विस्तार अधिकारी मोटे, शिक्षण विस्तार अधिकारी तुरुकमारे यांचा अहवाल वंद वसत्यात !

**बीड । प्रतिनिधी**

बीड येथील हजरत मन्सूर शाह' शाळेची चौकशी पूर्ण झाली असून अहवाल गड विकास अधिकारी समुंदर खान, शिक्षण विस्तार अधकारी मोटे, शिक्षण विस्तार अधिकारी मिलिंद तुरुकमारे, यांच्या समितीने प्राथमिक शिक्षणाधिकारी फुलारी यांच्याकडे सुपूर्त केला आहे. मात्र या अहवालामध्ये नेमके शाळेच्या कोणती टिप्पणी करण्यात आली हे मात्र गुलदस्त्यात आहे. बीड येथील शिक्षण विभागात गाजत असलेला भ्रष्टाचार उघड होण्याच्या मार्गावर आहे. प्राथमिक व माध्यमिक शिक्षण अधिकारी यांच्यावर कोट्यावधी रुपयांचा भ्रष्टाचार केलाचा आरोप करण्यात आला असून विभागीय स्तरावर चौकशी समिती या दोघांच्या काराभाराची चौकशी करणार आहे. बीड जिल्ह्यात शिक्षण क्षेत्रामध्ये मोठा भ्रष्टाचार सुरू असून याकडे प्राथमिक शिक्षणाधिकारी फुलारी यांचे दुर्लक्ष होत असून बीड जिल्ह्यात बोगस शाळांचा सुळसुळाट निर्माण झाला आहे.

हजरत मन्सूर शाह एज्युकेशन संस्था' या शिक्षण संस्थेच्या नावावर शहरात शाळा चालवल्या जात आहेत, मात्र या शाळा नेमक्या कुठे आहेत, याबाबत शिक्षण विभागाकडे कोणतीही स्पष्ट माहिती नाही. यामुळे संबंधित संस्थेवर बोगस शाळा चालवण्याचे आरोप होत आहेत.शाळेची मान्यता शहरातील कोणत्या भागासाठी आहे, हे स्पष्ट नसताना त्या परिसरात शाळेचे प्रत्यक्ष अस्तित्वच नाही. जर शाळा प्रत्यक्षात नसेल, तर त्वरित शाळेची चौकशी करून संस्था चालक व मुख्याध्यापक यांच्याविरोधात फौजदारी गुन्हा दाखल करावा, अशी जोरदार मागणी होत आहे. या संस्थेच्या निष्काळजी कारभारामुळे विद्यार्थ्यांचे मोठे शैक्षणिक नुकसान होत असल्याचे समोर आले आहे. बीड शहरात विविध ठिकाणी शाळा चालवल्या जात असल्याचा दावा करण्यात येतो, मात्र कोणत्याही ठिकाणी मुलांना आवश्यक त्या शैक्षणिक आणि भौतिक सुविधा दिल्या जात नाहीत. वर्गखोल्या, शौचालये, ▶▶ उर्वरित पान २ वर

## कुंडमळ्यात चौघांचा मृत्यू, 50 जण वाचले,

### अजूनही 20 ते 25 जण वाहून गेल्याची भीती

**पुणे । प्रतिनिधी**

रविवार पुण्याच्या मावळमधील कुंडमळ्याजवळ पर्यटनासाठी गेलेल्या पर्यटकांसाठी घातवार ठरला. कुंडमळ्याजवळील इंद्रायणी नदीवरचा पूल कोसळला आणि या दुर्घटनेत चार पर्यटकांचा मृत्यू झाला. यामध्ये बचाव कार्य सुरू असून आतापर्यंत एकूण ५० जणांना वाचवण्यात यश आलं. रविवारी दुपारी तीन ते साडेतीन वाजण्याच्या सुमारास ही पूल




दुर्घटना घडली. या पुलाखाली एक लहान मुलगा अडकला होता. त्याचाही मृत्यू झाला. तसेच या दुर्घटनेमध्ये अजूनही २० ते २५ जण वाहून गेल्याची माहिती आहे.

कोसळलेला पूल हा सुमारे ३० वर्षे जुना असून तो गंजलेल्या अवस्थेत होता. त्यावरून दोन चाकी गाड्याही जात असल्याची माहिती आहे. अशात रविवारी सुट्टीचा दिवस असल्याने पर्यटकांनी कुंडमाळ्यात मोठ्या प्रमाणात गर्दी केली. ज्यावेळी इंद्रायणी नदीवरील हा पूल कोसळला त्यावेळी पुलावर १०० पर्यटक असल्याची माहिती आहे. त्यामुळे या दुर्घटनेतील मृतांची आकडेवारी अजून वाढण्याची शक्यता आहे.

एनडीआरएफच्या जवानांनी हा पूल मधोमध कट केला असून क्रेनच्या सहाय्याने तो पूल उचलला जात आहे. या पुलाखाली एक मुलगा ▶▶ उर्वरित पान २ वर

## चकलांबा पोलिसांना जाग आली एलसीबीच्या कारवाईनंतर सिंदफणा नदीत वाळूचे ट्रॅक्टर पकडले



**बीड । प्रतिनिधी**

स्थानिक गुन्हे शाखेच्या कारवाईनंतर चकलांबा पोलीस ठाण्याचे सोपोनी पाटील यांनी गुप्त माहितीच्या आधारे सिंदफणा नदी पात्रात वाळूचे ट्रॅक्टर पकडले आहे. सात लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त करत चकलाबा पोलीस ठाण्यात ट्रॅक्टर चालक व मालका विरोधात गुन्हा नोंद करण्यात आला आहे. स्थानिक गुन्हे शाखेच्या वतीने चकलांबा परिसरात तब्बल १७ लाख रुपयांचा मुद्देमाल वाळू सहित जप्त केला होता. ही कारवाई मोठी झाल्याने चकलंबा पोलिसांनी हातपाय मारत एका ट्रॅक्टर चालकावर कारवाई केली आहे. चकलंबा पोलीस स्टेशनचे सपोनि संदिप पाटील यांना गोपनीय माहिती मिळाली की, मौजे धारवांटा शिवारात सिंधफना नदीत एक ▶▶ उर्वरित पान २ वर

## पुतळा भक्कम, पण आता चबुतऱ्याला भगदाड पडलं

### मालवणच्या राजकोट किल्ल्यावरील शिवरायांच्या पुतळ्याच्या चबुतऱ्याची जमीन खचली



**सिंधुदुर्ग**

मालवणमधील राजकोट किल्ल्यावरील नव्याने उभारलेल्या शिवरायांच्या पुतळ्याच्या चबुतऱ्याच्या बाजूची जमीन खचली आहे. या ठिकाणी प्रवेश केल्यानंतर शिवाजी महाराजांच्या पुतळ्याच्या डाव्या बाजूला त्या ठिकाणी मोठं भगदाड पडल्याचं ▶▶ उर्वरित पान २ वर

## केदारनाथमध्ये महिन्यात चौथ्यांदा हेलिकॉप्टरचा अपघात;

### महाराष्ट्रातील चिमुरड्यासह ७ जणांवर काळाचा घाला

**केदारनाथधाम**

अहमदाबादमध्ये नुकत्याच झालेल्या विमान दुर्घटनेला अवघे काही दिवस झाले असताना, आता उत्तराखंडमधील केदारनाथधाम जवळ मोठा हेलिकॉप्टर अपघात झाल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. आर्यन एव्हिएशन कंपनीचे हे हेलिकॉप्टर गौरीकुंड आणि त्रिजुगीनारायण दरम्यानच्या जंगलात कोसळले, आणि या भीषण अपघातात पायलटसह ७ जणांचा मृत्यू झाल्याची प्राथमिक माहिती आहे. हेलिकॉप्टर डेहराडूनहून केदारनाथच्या दिशेने निघाले होते, मात्र काही वेळातच गौरीकुंडमध्ये ते बेपत्ता झाल्याची माहिती उत्तराखंडचे एडीजी लॉ अँड ऑर्डर डॉ. वी. मुरुगेशन यांनी दिली आहे. अपघाताचे कारण खराब हवामान असल्याचे सांगण्यात येत आहे.



दाट धुके आणि कमी दृश्यतेमुळे हेलिकॉप्टरने नियंत्रण गमावले असण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

रेस्क्यू पथक तत्काळ घटनास्थळी रवाना झाले असून बचावकार्य सुरू आहे. अधिकृत मृतांची नावे अद्याप जाहीर करण्यात आलेली नाहीत. आर्यन एव्हिएशन कंपनीचे हेलिकॉप्टर यात्रेच्या हंगामात भाविकांना केदारनाथपर्यंत पोहोचवण्याची सेवा देत होते. या अपघातामुळे भाविकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. अहमदाबाद विमान अपघातानंतर अवघ्या तीन दिवसांत झालेली ही दुसरी हवाई ▶▶ उर्वरित पान २ वर

## कमरेला पिस्टल लावून फिरणाऱ्यांना शिवाजीनगर पोलिसांनी केले जेरबंद !



**बीड । प्रतिनिधी**

शिवाजीनगर पोलीस ठाणे हद्दीतील गोंविंदनगर धानोरा रोड, बीड या ठिकाणी होंन्डा शाईन मो.सा. क्र. चक १४ क १६०८ यावर दोन इसम असुन त्यापैकी एका इसमाचे कंबरेला पिस्टल लावुन ते फिरत असल्याचे गोपनीय माहिती शिवाजीनगर पोलीस ठाणेचे पोलीस निरीक्षक किशोर पवार यांना मिळालेने सदर बातमीचे अनुषंगाने खात्री करुन कारवाईकामी तात्काळ पोलीस ठाणे स्थरावर पथक तयार करुन रवाना केले होते. पथकातील अधिकारी व अंमलदार यांनी मिळालेल्या बातमीप्रमाणे गोंविद नगर येथील सिमेंट रोडवर व महाराणा प्रताप चौकाचे दरम्यान सापळा रचुन थांबलेले असतांना मो.सा.क्र. MH 14 H 1608 यावर दोन इसम येतांना दिसले. त्यावेळी नमुद पथकातील अधिकारी व अंमलदार यांनी त्यांना थांबवण्याचा प्रयत्न केला असता सदर इसमांनी सदरची मो.सा. चालु स्थितीत सोडुन ते करपरा ▶▶ उर्वरित पान २ वर

## मादळमोही जवळील विठ्ठल गडावर उगवली विकासाची पहाट

### कोट्यावधी रुपयांतून साकारल्या योजना, अध्यात्मासह शिक्षणावर भर

**बीड । प्रतिनिधी**

गेवराई तालुक्यातील मादळमोही गावाजवळून हाकेच्या अंतरावर असलेल्या डोंगर कुशीत वसलेलं अनेक शतकांचं विठ्ठल गड देवस्थान आहे. डोंगर पठारावर वसलेलं श्री विठ्ठल देवस्थान अध्यात्माचं अधिष्ठान आहे. मात्र गेल्या काही वर्षात येथे भाविकांना सोयी उपलब्ध नसल्याने अडचणी यायच्या. याच गोष्टींची दखल घेत श्री क्षेत्र नारायण गडचे महंत ▶▶ उर्वरित पान २ वर



### ● दर्जेदार शिक्षणाचे केंद्र: संभाजी महाराज

श्रीक्षेत्र नारायणगडचे उत्तर अधिकारी तथा मादळमोही येथील जगद्गुरु संत तुकाराम महाराज संस्थानचे मताधिपती संभाजी महाराज म्हणाले की श्री क्षेत्र नारायण गडणे महंत शिवाजी महाराज यांच्या मार्गदर्शनाखाली आध्यात्मिक क्षेत्राबरोबरच सामाजिक व शैक्षणिक क्षेत्रात भरीव कार्य सुरू केले आहे. श्री क्षेत्र नारायण गडचे पाईक म्हणून हेच कार्य पुढे नेण्यासाठी आपण विठ्ठल गड येथेही प्रयत्न करत आहोत. मुलांना अध्यात्माबरोबर दर्जेदार शिक्षणही देण्यासाठी सोयी सुविधा उपलब्ध केल्या जात आहे. आज २१ व्या शतकात समाजाला अध्यात्म बरोबर दर्जेदार शिक्षणाची गरज आहे. शिक्षणाशिवाय आपली प्रगती नाही व सामाजिक विकासही नाही याची जाणीव ठेवत विठ्ठल गड येथून भौतिक सुविधा सह दर्जेदार शिक्षणही दिले जाणार असल्याचे महंत संभाजी महाराज म्हणाले.




# लोकशाहीचे भान आणि मर्यादा: सरकारी कार्यालयातील हस्तक्षेप म्हणजे अधिकार की अतिक्रमण ?

लोकशाही व्यवस्थेतील एक महत्त्वाचा सिद्धांत म्हणजे जनता हीच खरी मालक असते. संविधानाने आपल्याला अभिव्यक्ती स्वातंत्र्य, माहितीचा अधिकार आणि शासनावर लक्ष ठेवण्याचा हक्क दिला आहे. परंतु हे अधिकार वापरताना जर आपण कायद्याच्या आणि नैतिकतेच्या चौकटीत राहिलो नाही, तर सजग नागरिकत्वाचे रूप सहजच अराजकतेत बदलू शकते. नुकत्याच एका घटनेत याचे ठळक उदाहरण पाहायला मिळाले. एका निवृत्त प्राध्यापकांनी समाजकार्याच्या उद्देशाने थेट सरकारी कार्यालयात प्रवेश केला. त्यांच्या गळ्यात ओळखपत्र, अंगात नेहरू शर्ट, सोबत एक छायाचित्रकार आणि चार-पाच कार्यकर्ते होते. सुरक्षा रक्षकाने त्यांना थांबवताच, त्यांनी उत्तर दिले, मी या देशाचा मालक आहे. मला कुठल्याही लोकसेवकाच्या सरकारी कार्यालयात जायचा अधिकार आहे.

सुरक्षा रक्षकाने नियमांची आठवण करून दिली. तरीही त्यांनी जोर देऊन सांगितले की आपण सुशिक्षित आहोत, काही गैरवर्तन करणार नाही, फक्त प्रशासन कसे चालते हे दाखवण्याचा उद्देश आहे. ते थेट एका अधिकाऱ्याच्या केबिनमध्ये शिरले. अधिकारी गैरहजर होते, तरीही ते त्यांच्या खुर्चीत बसले आणि आदेश देण्यास सुरुवात केली. महिला अधिकारी शिष्टाचाराने उभी राहिली असता, त्यांच्यावर प्रश्नांची सरबत्ती सुरु झाली – साहेब कुठे गेले ? त्याची नोंद रजिस्टरवर आहे का ? रजिस्टर दाखवा! ते संपूर्ण कार्यालयात फेरफटका मारतात, कॅमेरासमोर अधिकाऱ्यांशी प्रश्नोत्तर करतात आणि काहींची अनुपस्थिती टिपतात. अखेरीस बाहेर येऊन जाहीर करतात की, हीच खरी सजग नागरिकता आहे. सरकार कसे चालते ते आपण लोकांना दाखवतो.

पण खरोखरच अशा प्रकारचे वर्तन लोकशाहीच्या चौकटीत बसते का ? मतदार हा खरोखरच देशाचा मालक असला तरी, त्याचा अर्थ असा होतो का की तो कोणत्याही सरकारी कार्यालयात कुठलीही परवानगी न घेता जाऊ शकतो, तिथे चित्रीकरण करू शकतो, अधिकाऱ्यांना अडचणीत टाकू शकतो ? भारतीय संविधानाचे मुल्य पाहता, उत्तर 'नाही' असेच आहे. अधिकारांसोबतच मर्यादाही असतात. भारतीय दंड संहितेचे कलम ४४७ स्पष्ट सांगते की परवानगीशिवाय कोणत्याही खासगी किंवा सार्वजनिक स्थळी प्रवेश केल्यास तो 'गैरकायद्याने प्रवेश' (लीळाळपरश्र ीींशीिरीि) मानला जातो. तसेच, सरकारी कर्मचाऱ्याच्या कर्तव्यात अडथळा निर्माण करणे (कलम १८६) आणि सरकारी कर्मचाऱ्याला धाक दाखवून जबरदस्तीने काम करवून घेणे (कलम ३५३) हे गुन्हे आहेत. कार्यालयात चित्रीकरण करणे हे गंभीर प्रकरण आहे. त्यासाठी स्पष्ट लेखी परवानगी आवश्यक असते. सरकारी कार्यालयात अनेक संवेदनशील कागदपत्रे, फायली आणि माहिती असते. त्यामुळे माहिती मिळवण्यासाठी योग्य मार्ग म्हणजे माहिती अधिकार कायदा (ठढख लीं) वापरणे. अभिव्यक्ती स्वातंत्र्य आणि माहितीचा अधिकार या दोन मूल्यांवर लोकशाही उभी आहे. पण हे अधिकार संविधानाने दिले असले तरी त्यांचा वापर प्रक्रियात्मक चौकटीतच केला गेला पाहिजे. कोणत्याही सरकारी कार्यालयात वेळ, उद्देश, वर्तन याबाबत ठरलेली शिस्त आणि नियम आहेत. ते मोडून ज्या पद्धतीने प्रसंग घडला, तो 'सजग नागरिकता' नसून 'व्यवस्थेतील अतिक्रमण' ठरतो.



डॉ भारत कऱ्हाड
चार्टर्ड अकाउंटंट, प्राध्यापक, संशोधक व प्रशासकीय अधिकारी

सजग नागरिकाला सरकारच्या कामकाजावर लक्ष ठेवण्याचा अधिकार आहे, पण त्यासाठी कायदेशीर आणि प्रभावी मार्ग उपलब्ध आहेत. ठढख कायदा, तक्रार नोंद प्रणाली, लोकप्रतिनिधींमार्फत पाठपुरावा, लोकपाल व जनसुनावणी या माध्यमातून प्रशासनावर नियंत्रण ठेवता येते. यामार्गे मिळालेली माहिती अधिकृत असते आणि तिला कायदेशीर मूल्य असते. थेट कार्यालयात घुसून, अधिकारी अनुपस्थित आहेत की नाही हे तपासणे, त्यांना प्रश्न विचारणे, चित्रीकरण करणे आणि ते जनतेसमोर आणणे – या कृती फक्त नियमभंग करणाऱ्या नसतात तर त्या समाजात चुकीचा संदेश देणाऱ्या ठरतात. या प्रकारातील आणखी एक चिंताजनक बाब म्हणजे महिला अधिकाऱ्यांवर होणारा परिणाम. कोणत्याही स्त्रीचे परवानगीशिवाय चित्रीकरण करणे, आणि ते प्रसारित करणे हा फक्त नैतिक दोष नाही, तर कायदेशीर गुन्हाही आहे. खढ कायद्याप्रमाणे आणि महिला सन्मानासंदर्भातील कायद्यांनुसार, अशा कृतींना शिक्षा होऊ शकते. याचा मानसिक आणि सामाजिक परिणाम गंभीर असतो. बरेचदा अशा घटनांमुळे संबंधित व्यक्ती मानसिक तणावात येतात. त्यांच्या सामाजिक प्रतिष्ठेवर गदा येते. कधी कधी हे परिणाम इतके टोकाचे असतात की, आत्महत्येसारख्या घटनाही घडू शकतात. लोकशाही म्हणजे 'सत्ता जनतेची' असली, तरी तिचा अर्थ 'अनियंत्रित मालकी' असा होत नाही. उलट, ती जास्त जबाबदारीने वागण्याची शिकवण देते. सजग नागरिकत्व म्हणजे कायद्याच्या चौकटीत राहून प्रशासनावर लक्ष ठेवणे, प्रश्न विचारणे, आणि गरज भासल्यास अधिकृतरीत्या आंदोलन करणे. पण सजगतेच्या नावाखाली जर अराजकतेची बीजे पेरली जात असतील, तर ती लोकशाहीसाठी घातक आहे.

सरकारी अधिकारी हे सार्वजनिक सेवा करणारे घटक आहेत. त्यांच्यावर दबाव टाकून, भीती दाखवून किंवा अपमान करून व्यवस्थेमध्ये सुधारणा होणार नाही. उलट त्यामुळे त्यांच्यात असुरक्षिततेची भावना निर्माण होते, जी सेवाभावावर परिणाम करते. नागरिकांनी जर व्यवस्थेवर विश्वास गमवला, आणि प्रशासनाने जनतेपासून स्वतःला तोडून घेतले, तर लोकशाहीचा आत्मा हरवतो. अशा प्रकारच्या घटना आपल्याला सजग करतात. आपण आपल्या अधिकारांची जाणीव ठेवायलाच हवी, पण त्यासोबत मर्यादांचे भानही असले पाहिजे. सजग नागरिक हा व्यवस्थेचा भाग असतो, विरोधक नव्हे. त्याच्या कृतींनी लोकशाही मजबूत व्हायला हवी, कमकुवत नव्हे.

महत्वाचे म्हणजे, लोकशाही ही केवळ एक शासनपद्धती नाही, ती एक सामाजिक नातेसंबंधांची प्रणाली आहे – जिथे सन्मान, शिस्त, कायदा आणि संवाद या चार स्तंभांवर तिचे अस्तित्व टिकते.

## पान १ वरून पुढे...

### शिक्षणाधिकारी फुलारी....

पिण्याचे पाणी, फर्निचर यासारख्या मूलभूत सुविधा देखील अपुऱ्या असल्याच्या तक्रारी आहेत. शाळेमध्ये शासनाच्या पोषण आहार योजनेअंतर्गत विद्यार्थ्यांना नियमित आहार दिला जात नाही. शासनाकडून येणाऱ्या पोषण आहाराचा वापर व्यवस्थित न होता त्याचा अपव्यवहार होत असल्याची शंका अनेकांनी व्यक्त केली आहे. या प्रकरणात सखोल चौकशी करून संस्था चालकावर कठोर कारवाई व्हावी, अशी मागणी करण्यात येत आहे. या पूर्ण प्रकरणात शिक्षण विभागाच्या दुर्लक्षाची भूमिका स्पष्ट दिसून येते. शिक्षणाधिकारी यांची या प्रकरणात चौकशीसह स्पष्ट भूमिका अपेक्षित असून बोगस शाळा चालवणाऱ्या संस्थांवर कठोर कारवाई करणे अत्यावश्यक बनले आहे. या शाळे विरोधात प्राथमिक शिक्षणाधिकारी फुलारी यांनी चौकशी समिती नेमली होती तीन दिवसात अहवाल सादर करण्याचे आदेश गटशिक्षण अधिकारी यांच्या नेतृत्वाखाली जिल्हा परिषद प्राथमिक विभागातील दोन विस्तार अधिकाऱ्यांकडे देण्यात आले होते. चौकशी समितीने अहवाल सादर केला आहे मात्र या अहवालात शाळा संदर्भात कोणती भूमिका प्राथमिक शिक्षणाधिकाऱ्यांनी घेतली . विशेष म्हणजे चौकशी समितीने शाळेची तपासणी हे सुट्ट्यामध्ये केल्याने नेमके चौकशी समितीला या सुट्ट्याच्या काळात कोणती महत्त्वाची माहिती मिळाली असा प्रश्न उपस्थित होत आहे. बीड जिल्ह्यातील अशा प्रकारच्या संस्थांमुळे शिक्षण व्यवस्थेचा दर्जा खालावत असून विद्यार्थ्यांचे भविष्य धोक्यात येत आहे. त्यामुळे पालक, शिक्षक, आणि समाज यांनी सजग राहून अशा संस्थांविरोधात एकत्रित पाऊले उचलण्याची गरज आहे.

### कुंडमळ्यात चौघांचा...

अडकला होता. त्याला बाहेर काढण्यात आलं आहे. आणखी एक व्यक्ती पुलाच्या खाली दबला असून त्यालाही बाहेर काढण्याचा प्रयत्न केला जात आहे. दरम्यान, या दुर्घटनेत मृत पावलेल्यांच्या कुटुंबीयांना पाच लाखांची मदत राज्य सरकारकडून केली जाणार आहे. तर या घटनेत जखमी झालेल्यांचा उपचाराचा खर्चही सरकारकडून केला जाणार आहे. दुर्घटनेची चौकशी होणार- इंद्रायणी नदीवरचा लोखंडी पूल गंजलेला होता, त्यामुळे ही दुर्घटना घडल्याची माहिती उपमुख्यमंत्री अजित पवारांनी दिली. या दुर्घटनेच्या कारणांची चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करणार असंही अजित पवार म्हणाले. सगळ्या पुलांचे स्ट्रक्चरल-ऑडिट होणार- कुंडमाळा येथे झालेली घटना अत्यंत दुर्दैवी असल्याची प्रतिक्रिया उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिली. राज्यातील सगळ्या नदीवरच्या पुलाचं स्ट्रक्चरल ऑडीट करण्याच्याही सूचनाही त्यांनी दिल्या. रविवारमुळे पर्यटकांचा गर्दी -कुंडमळा हे ठिकाण प्रसिद्ध पर्यटनस्थळ असून हे ठिकाण धोकादायक असल्याचं सांगितलं जातय. पावसाळ्यात, विशेषतः शनिवार आणि रविवारी या ठिकाणी पर्यटक मोठी गर्दी करतात. या ठिकाणी नदीवर जुना पूल आहे. त्याचीही डागडूजी करण्यात आली नाही. असं असलं तरी प्रशासनाने त्यांच्या सुरक्षेसाठी कोणतीही उपाययोजना केली नसल्याचं दिसून येतंय. त्यामुळेच ही दुर्घटना घडल्याचं सांगितलं जात आहे. पुणे परिसरात गेल्या चार दिवसांपासून मोठ्या प्रमाणात पाऊस पडला आहे. त्यामुळे इंद्रायणी नदीच्या पाण्याचा प्रवाहही मोठा आहे. असं असूनही पर्यटकांच्या सुरक्षेसाठी कोणतीही उपाययोजना करण्यात आली नाही.

### चकलांबा पोलिसांना...

ट्रॅक्टर अवैध रित्या वाळू उपसा करुन ट्रॅक्टर मध्ये भरत आहे, या वरून पोलीस पथकाने सदर ठिकाणी छापा टाकला असता ट्रॅक्टर मध्ये वाळू भरणारे यांच्या लक्षात येताच त्यांनी वाळू नदी मध्ये टाकुनं ट्रॅक्टर पळवून घेऊन गेले, त्यावेळी पोलीस पथकाने त्यांचा पाठलाग करुन गावात ट्रॅक्टर चा शोध घेतला असता ट्रॅक्टर क्रमांक चक२३ इक२०३१ ताब्यात घेतले. ट्रॅक्टर चालक व मालक यांचेविरुद्ध चकलंबा पोलीस स्टेशन येथे गुन्हा दाखल करण्यात आला असून एकूण ७,००,०००/- रु चा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. सदरील कारवाई पोलीस अधीक्षक श्री.नवनीत काँवत, अपर पोलीस अधिक्षक सचिन पांडकर, यांचे मार्गदर्शनाखाली सपोनि संदीप, पाटील पोउपनि पानपाटील, पोलीस अंमलदार मिसाळ,पोलीस अंमलदार खटाने पोलीस अंमलदार घोगडें यांनी केली आहे.

### पुतळा भक्कम...

दिसून आलं आहे. त्यामुळे सरकारने कितीही दावा केला असला तरी चबुतऱ्याच्या आजूबाजूचे बांधकाम निकृष्ट दर्जाचं झाल्याचं स्पष्ट झालं आहे. मालवण मधील राजकोट किल्लयावरील नव्याने उभारण्यात आलेल्या शिवरायांच्या पुतळ्या चबुतऱ्याच्या बाजूची जमीन खचली. त्या ठिकाणची जमीन खचल्याने मोठं भगदाड पडल्याचं समोर आलं. या संबंधी एक व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल होत आहे. मालवणच्या राजकोट किल्लयावर या आधी शिवाजी महाराजांचा पुतळा उभारण्यात आला होता.

महाराजांचा पुतळा सुरक्षित- शिवाजी महाराजांचा पुतळा ज्या ठिकाणी आहे त्याच्या चबुतऱ्याची बाजूची जमीन खचली आहे. पण महाराजांचा पुतळा सुरक्षित आहे. शिवाजी महाराजांच्या पुतळ्याला कोणताही धोका नसल्याचं प्रशासनाने स्पष्ट केलं आहे. या आधी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते उद्घाटन करण्यात आलेला पुतळा कोसळला होता. त्यानंतर वर्षभराच्या आत त्याच ठिकाणी नवीन पुतळा उभा करण्यात आला. मे महिन्यात या पुतळ्याचे उद्घाटन राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते करण्यात आलं होतं. या पुतळ्याच्या चबुतऱ्याची जमीन आता खचली आहे.

### केदारनाथमध्ये महिन्यात...

दुर्घटना असल्याने हवाई सुरक्षेबाबत प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहेत.

आर्यन एव्हिएशन कंपनीचे हे हेलिकॉप्टर केदारनाथ यात्रेच्या पार्श्वभूमीवर सेवा देत होते. यात्रेच्या हंगामात हजारो भाविक हेलिकॉप्टरद्वारे केदारनाथ धाम गाठत असतात. दरम्यान, स्थानिक प्रशासन, पोलीस आणि एनडीआरएफचे पथक घटनास्थळी दाखल होत असून जखमी प्रवाशांना तातडीने रुग्णालयात हलवण्याचे प्रयत्न सुरू आहेत. अधिकृत मृतांची संख्या आणि इतर तपशील लवकरच प्रशासनाकडून जाहीर केला जाणार आहे. उत्तराखंडचे एडीजी कायदा आणि सुव्यवस्था डॉ. व्ही. मुरुगेशन यांनी घटनेबाबत माहिती देताना सांगितलं की, गौरीकुंडमध्ये बेपत्ता झालेले हेलिकॉप्टर कोसळले आहे. अपघातग्रस्त हेलिकॉप्टरमध्ये ७ जण होते. अधिक माहितीची प्रतीक्षा आहे. मिळालेल्या माहितीनुसार, सकाळी ५:१७ वाजता आर्यन कंपनीचे हेलिकॉप्टर केदारनाथ हेलिपॅडवरून गुप्तकाशी हेलिपॅडकडे ७ भाविकांना घेऊन निघाले. वाटेत खराब हवामानामुळे, हेलिकॉप्टर दुसऱ्या ठिकाणी कठीण लँडिंगला गेले त्यामुळे दुर्घटना झाली आहे. मृतांमध्ये २ मुलांचाही समावेश आहे. हे हेलिकॉप्टर आर्यन एव्हिएशनचे होते. गौरीकुंडमध्ये हा अपघात झाला आहे, केदारनाथ धामहून फाटा येथे येणारे हेलिकॉप्टर कोसळले आहे. उत्तराखंडमधील रुद्रप्रयाग येथील गौरीकुंड परिसरात एक मोठा अपघात झाला आहे. रविवारी सकाळी केदारनाथ मार्गावर एक हेलिकॉप्टर कोसळले. हेलिकॉप्टरमध्ये एकूण सात जण होते. या दुर्दैवी अपघातात सर्व जणांचा मृत्यू झाला असल्याची माहिती आहे.

### कमरेला पिस्टल...

नदीकडे पळु लागले. त्यावेळी नमुद पथकातील पोलीस अधिकारी व अंमलदार यांनी त्यांचा दोन ते तीन किलो मिटर नदीतुन पाठलाग करुन कसोशीचे प्रयत्न करुन त्यांना पकडले. त्यावेळी सदर इसमांना त्यांचे नाव पत्ता विचारले असता त्यांनी त्यांचे नाव सुयोग उर्फ छोट्या मच्छिद्र प्रधान वय २५ वर्षे रा. विवेकानंद शाळेजवळ, गोंविदनगर धानोरा रोड, बीड स्वप्नील उर्फ आदित्य उर्फ सोपनदार अशोक पाखरे वय ३० वर्ष रा. भिंगार ता.जि. अहिल्यानगर असे असल्याचे सांगीतले. त्यावेळी नमुद दोन्ही इसमांची अंगझडती घेतली असता अंगझडतीत इसम नामे सुयोग उर्फ छोट्या मच्छिद्र प्रधान यांची अंगझतीत एक गावठी बनावट लोखंडी पिस्टल ज्यास मॅग्जीन नसलेला जु.वा.किं. ४०,०००/- रु. असा मिळुन आल्याने सदरचा गावठी पिस्टल व गुन्ह्यात वापरलेली मो.सा. चक१४ क१६०८ ही जप्त करण्यात आली. यातील आरोपी सुयोग उर्फ छोट्या मच्छिद्र प्रधान यांचे विरुध्द बीड जिल्ह्यातील वेगवेगळया पोलीस ठाणे येथे एकुण ०६ गुन्हे दाखल आहेत. तसेच आरोपी स्वप्नील उर्फ आदित्य उर्फ सोपनदार अशोक पाखरे याचे विरुध्द आहिल्यानगर जिल्ह्यातील वेगवेगळया पोलीस ठाणे येथे एकुण ०८ गुन्हे दाखल असुन सदर आरोपींवर दाखल असलेले गुन्हे हे चोरी, जबरी चोरी, घरफोडी व अवैध शस्त्र बाळगने अशा प्रकारचे आहेत. सदरची कारवाई पोलीस अधीक्षक नवनित काँवत अपर पोलीस अधीक्षक पांडकर उपविभागीय पोलीस अधिकारी, उपविभाग, बीड कमलेश मिना यांचे मार्गदर्शनाखाली शिवाजीनगर पोलीस ठाणेचे पोलीस निरीक्षक. किशोर पवार, सपोनि / दुन्गहु, सपोनि / क्षिरसागर, पोहवा/१६६४ आघाव, पोना/४७० मराडे, पोशि/४८७ येवले, पोशि/२०७७ रहाडे, पोशि/९०४ महानोर, पोशि/६६५ आगलावे, पोशि/५११ सानप, पोशि/४८५ कांदे यांनी केली असुन सदर गुन्हयाचा पुढील तपास सपोनि/ दुनगहु हे करत आहेत.

### मादळमोही जवळील....

शिवाजी महाराज यांच्या कृपाशीर्वादाने व श्रीक्षेत्र नारायण गडचे उत्तराधिकारी संभाजी महाराज यांच्या पुढाकारातून या विठ्ठल गडावर आता विकासाची पहाट उगवली आहे. महंत शिवाजी महाराज आपल्या कीर्तनातून वारंवार सांगतात शेतीविका परंतु आपल्या मुलांना शिका, त्याच युक्तीची जाण ठेवत श्री विठ्ठल गडावरून आता अध्यात्मा बरोबर शिक्षणाची ही मुहूर्तमेंत रोवल्या जात आहे. गडावर वृक्षारोपणातून निसर्ग सौंदर्य मोठ्या प्रमाणात खुले असून भक्तनिवास दक्षिण मारुती मंदिर विद्यार्थ्यांसाठी राहण्या साठी होस्टेल अभ्यासिका व सुसज्ज असे रस्ते पिण्याच्या पाण्याची सोय आधी सोयी विठ्ठल गडावर आता साकारत आहेत. यामुळे विठ्ठल गडावर विकासाची पहाट उगवल्याची भावना भाविकातून व्यक्त होत आहे. मादळमोही पासून काही अंतरावर डोंगरावर असलेल्या श्री विठ्ठल मंदिर हे मादळमोही सह परिसरातील भाविकांचे श्रद्धास्थान व अध्यात्मिकऊर्जा केंद्र आहे. गेल्या अनेक शतकापासून मादळमोही सह परिसरातील भाविक या विठ्ठल गडावर पूजापाठसह वारकरी संप्रदायाची पताका रोवून आहेत. या गडावरून हरिनामाचा जागर सतत होत असतो. असा महत्त्वाचा गड असला तरी गेल्या काही वर्षापासून गडावर भाविकांसाठी पुरेशा सोयी सुविधा उपलब्ध नसल्याने हा गड काहीसा अडगळीला पडल्यासारखा होता. एकीकडे श्रीक्षेत्र नारायण गड, मादळमोही येथील जगद्गुरु संत तुकाराम महाराज मंदिर असे संस्थान भव्य स्वरूप घेत असताना या गडावरही भाविकांसाठी विकास कामे व्हायला पाहिजे अशी भूमिका महंत शिवाजी महाराज यांनी व्यक्त केली होती. श्री क्षेत्र नारायण गड असो, पंढरपूर असो, आळंदी असो, पैठण असो किंवा मादळमोही अशा ठिकाणी भाविकांसाठी सोयी सुविधा निर्माण व्हाव्यात व येथून अध्यात्माबरोबर समाज सन्मार्गाला लावणे व मुलांचे शिक्षण यास महंत शिवाजी महाराज यांनी प्राधान्य देत त्या दृष्टीने गेल्या वीस वर्षात वाटचाल सुरू केली आहे. याच पावलावर पाऊल ठेवत महंत संभाजी महाराज यांनी श्री विठ्ठल गडाचा विकासाचा ध्यास घेतल्याने आज गडाचे रूपडे पालटल्याचे दिसून येत आहे. मादळमोही येथील ज्येष्ठ नागरिक आसाराम अण्णा तळेकर म्हणाले की श्री विठ्ठल गड येथे सोनाबाई (बायना अक्का) व शांताबाई या महिला भाविक वारकरी भक्तांनी तहहयात विठ्ठल गडाची सेवा केली, या सेवेचे आज वटवृक्षात रूपांतर झाल्याचे दिसून येत असल्याचेही तळेकर अण्णा म्हणाले. आज घडीला विठ्ठल गड येथे साडेसात कोटी रुपयांची कामे सुरू आहेत. यामध्ये भव्य असे भक्तनिवास, दक्षीणमुखी मारुती मंदिर, विद्यार्थ्यांसाठी वसतीगृह, वाचनालय, भव्य हॉल, पिण्याचे पाण्याची सोय आदीसोयी उपलब्ध केल्या आहेत. विठ्ठल गड परिसरात मोठ्या प्रमाणात वृक्षारोपण केल्याने गडाने हिरवाईची कास धरली आहे. यासह सुसज्ज असे रस्ते व विद्युत रोषणाई केल्याने विठ्ठल गड दूरदुरहुनच आकर्षणाचे केंद्रही ठरत आहे.

## पान ४ वरून पुढे...

### नाळवंडीसह ग्रामीण...

आश्वासन मिळाल्याने हे आंदोलन तात्पुरते स्थगित करण्यात आले आहे, अशी माहिती सरपंच ड.राजेंद्र राऊत यांनी दिली आहे. बीड तालुक्यातील नाळवंडीसह इतर रस्त्याच्या कामासंबंधी कार्यारंभ आदेश ६ महिन्यांपूर्वीच देण्यात आला असूनही, आमदार संदीप क्षीरसागर यांनी 'या कामाचे भूमिपूजन माझ्याशिवाय होऊ नये' असा अडसर निर्माण केल्याने सार्वजनिक बांधकाम विभागाकडून अद्याप एकाही कामाचे मार्कआऊट झालेले नाही. यामुळे नाळवंडी गावासह बीड तालुक्यातील अनेक ग्रामीण भागातील रस्त्यांची कामे रखडली आहेत. या संदर्भात ग्रामपंचायतीने वेळोवेळी निवेदने देऊन, जिल्हाधिकारी कार्यालयासमोर धरणे आंदोलन करत प्रशासनाला जागे करण्याचा प्रयत्न केला. अखेर १६ जून रोजी जरुड फाटा येथे रास्ता रोको आंदोलन करण्याचा इशारा देण्यात आला होता. या पार्श्वभूमीवर पिंपळनेर पोलीस ठाण्याच्या प्रभारी पोलीस उपअधीक्षक पूजा पवार यांच्या मध्यस्थीमुळे सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता आर. पी. तोंडे व उपविभागीय अभियंता सी. पी. बोराडे यांनी संपर्क साधून, लेखी पत्राद्वारे आंदोलन स्थगित करण्याची विनंती केली. त्यांनी लवकरच भूमिपूजन करून, पावसाळ्यानंतर प्रत्यक्ष कामाला सुरुवात होईल असे लेखी आश्वासन दिले. तसेच सद्यस्थितीत रस्त्यावरील खड्डे तातडीने बुजवले जातील, असे तोंडी आश्वासनही दिले. या लेखी खात्रीच्या पार्श्वभूमीवर नियोजित रास्ता रोको आंदोलन तात्पुरते स्थगित करण्यात येत असल्याचे नाळवंडीचे सरपंच अ‍ॅड.राजेंद्र राऊत यांनी जाहीर केले. मात्र प्रशासनाने आश्वासनांची अंमलबजावणी वेळेत न केल्यास भविष्यात अधिक तीव्र स्वरूपाचे आंदोलन करण्यात येईल, असा इशाराही ड.राजेंद्र राऊत यांनी दिला आहे.

### नगरपरिषदेच्या वतीने...

सावता माळी मंदिरासमोरील रोड जैन भवन मार्गे सुभाष रोड पर्यंत स्वच्छता मोहीम घेण्यात यावी. तसेच बिंदुसरा नदी परिसरात बांबू व इतर झाडांची लागवड करावी अशी मागणी नगर परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी अंधारे मॅडम यांच्याकडे केली. या मागणीची दखल घेत मुख्याधिकारी अंधारे मॅडम यांनी बिंदुसरा नदी परिसर स्वच्छ्ता मोहीम हाती घेतली. या स्वच्छता मोहिमेची पाहणी मुख्याधिकारी नीता अंधारे, अमर नाईकवाडे, फारुख पटेल यांनी केली. यावेळी नदीच्या दुतर्फा मोठ्या प्रमाणात वृक्षारोपण करण्याच्या सूचना नाईकवाडे व पटेल यांनी करताच श्रीमती अंधारे यांनी लवकरच वृक्षारोपण सुरू करू असे आश्वासित केले. तसेच बिंदुसरा नदी शेजारील खासबाग देवी मंदिर, मोमीनपुरा, सोमेश्वर नगर आदी भागात देखील बिंदुसरा नदी शेजारी याच पद्धतीने स्वच्छता मोहीम करून वृक्षारोपण करण्यात यावे अशी सूचना देखील मुख्याधिकारी अंधारे यांना करण्यात आली . दरम्यान बिंदुसरा नदी परिसर स्वच्छ केल्यामुळे नागरिकांनी समाधान व्यक्त केले. यावेळी बीड नगर परिषदेच्या मुख्याधिकारी श्रीमती नीता अंधारे यांच्यासमवेत नगरसेवक अमर नाईकवाडे, गटनेते फारूक पटेल, माजी नगरसेवक अशफाक इनामदार परिसरातील नागरिक, नगरपरिषदेचे अधिकारी, कर्मचारी वर्ग व श्री संत सावता प्रतिष्ठानचे सदस्य उपस्थित होते.

### पोलीस निरीक्षक...

स्टेशन पेठ बीड येथे गु.र.नं. १६९/२०२५ कलम १२३,२७४,२७५ भा.न्या.सं. २०२३ प्रमाणे वर नमूद आरोपी यांचे ताब्यातील असलेल्या घरामध्ये वरील वर्णणाचा गुटखा किंमत- १,०९,०१७/-रूपायाचा गुटखा व मोटारसायकल MH-23 N 6336 असा एकूण १,३९,०१७/- रूपायाचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. सदरची कार्यवाही पोलीस अधीक्षक सो नवनीत काँवत अप्पर पोलीस अधीक्षक सो सचिन पांडकर, उपविभागीय पोलीस अधीकारी यांचे नेतृत्वाखाली मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक अशोक मुदिराज, पोह १६१३ रमेश, पोअं/१९६१ अल्ताफ, चालक पोअ/२१८० अनिल सर्व नेमणूक पोलीस स्टेशन पेठ बीड यांनी पार पाडली.

### संतोष देशमुख...

आंदोलनाची पूढील तारीख ही पुढे ठरणार असल्याचे बोललं जात आहे. आरोपींना मदत करणारे लोकांकडून आम्हाला धमक्या दाखवणे आणि ब्लॅकमेल करणे, असे प्रकार होत असल्याने सोमवार दि.१६ रोजी देशमुख कुटुंबीय व मस्साजोग ग्रामस्थ रास्ता रोको करणार होते. याबाबतचे निवेदन केज तहसीलदार यांना देण्यात आले होते. मात्र आता हे आंदोलन स्थगित करण्यात आलं आहे.

### वाचाल तर वाचाल...

की पालकांनी आपल्या पाल्याशी मित्राचे नाते ठेवून आपला पाल्य काय वाचतो, कोणा कोणाशी सोबती करतो, किती वेळ घरा बाहेर राहतो, व तसेच शाळेतील प्रगतीकडे आणि तो मोबाईलच्या आहारी तर जात नाही ना यावर बारकाईने लक्ष ठेवणे व या मोबाईलच्या मायावी जगात कोणत्याही व्यसनाच्या आहारी तर जात नाही ना याकडे लक्ष ठेवणे अत्यंत गरजेचे आहे हे अनेक उदहारणा द्वारे समजावून सांगितले.या कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून प्राचार्य सुशील कुमार गायकवाड, भारतीय बौद्ध महासभेचे महाराष्ट्र राज्य संघटक आयु अमरसिंह ढाका, प्राध्यापक बबिता गायकवाड प्रमुख पाहुणे म्हणून लाभले होते. कार्यक्रमास विचार मंचावर महामानव अभिवादन ग्रुपचे अध्यक्ष जी.एम भोले सर, समता सैनिक दलाचे मेजर कॅप्टन राजाभाऊ आठवले, ज्येष्ठ नागरिक एस एस सोनवणे यांची प्रमुख उपस्थिती होती. सर्वप्रथम तथागत गौतम बुद्ध व भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्प व पुष्प माला अर्पण करून अभिवादन करण्यात आले.कार्यक्रमाचे प्रास्ताविक जी.एम भोले यांनी करून महामानव अभिवादन ग्रुप राबवित असलेल्या विविध उपक्रमाबद्दल सविस्तर माहिती देऊन अत्यंत गरजू असलेल्या परिसरात बीड शहरातील दोन ठिकाणी मोफत शिकवणी वर्ग चालविण्यात येत आहेत व त्या वर्गातील शिकलेली मुले शिक्षण घेत असलेल्या शाळेत उच्च गुण प्राप्त करून यश संपादन करीत आहेत.

### शासनाने बांधकाम...

दि १५/०६/२०२५रोजी बांधकाम कामगारांना गृहउपयोगी साहित्य किट वाटपाचा कार्यक्रम संपन्न झाला या वेळी प्रमुख पाहुणे महाराष्ट्र बांधकाम मजूर संघटनेचे संस्थापक अध्यक्ष शेख अमर, कृषी उत्पन्न बाजार समितीचे उपसभापती श्रीहरी नाना मोरे,सामाजिक जिल्हा अध्यक्ष नसीर शेख, जिल्हा उपाध्यक्ष आमेर शेख,कार्यकर्त्या सुनीताताई नेटके, संजीवनीताई राऊत, शितलताई धोंडरे,टाकणखार, प्रधान, शेख बाबा, शिक्षक संघटनेचे अध्यक्ष समीर शेख आदी उपस्थित होते. या कार्यक्रमाचे अध्यक्ष, यांच्या प्रमुख पाहुण्याचे संयोजक परमेश्वर सोळंके, शेख हमीद, अमर साळवे यांनी यथोचित स्वागत करत सत्कार केला. या वेळी बोलतानाअनेकांनी बांधकाम कामगारांच्या योजनाचे कौतुक केले कार्यक्रमाचे अध्यक्ष बहुजन विकास मोर्चा चे संस्थापक अध्यक्ष बाबुराजी पोटभरे बोलताना म्हणाले की शासन कामगारांच्या बाबत चांगल्या योजना राबवत आहे मात्र त्यांच्या किमान वेतणावर शासन दरबारीं विचार व्हावा कारण गरिबी खूप वाईट असते ति मी जवळून अनुभवलेली आहे काम करणारा एक आणि खाणारी तोंडे अनेक या बांधकाम कामगार खूप अडचणीत आहे अस्या बेठ बिगारी काम करणाऱ्या कामगारांना शासनाणे किमान वेतन वाढवून त्यांना इतरांप्रमाणे जीवन जगण्याचा अधिकार मिळावा असे बाबूरावजी पोटभरे यांनी सांगितले कार्यक्रमाचे सूत्रसंचलन प्रचंड सोळंके यांनी केले तर आभार शेख हमीद यांनी मानले या मोठया संख्येने बांधकाम कामगार महिला, पुरुष उपस्थित होते.

### जागतिक रक्तदान...

सैनिकांचा बालाघाट प्रतिष्ठान चे वतीने तिरंगी फेटा ट्रॉफी देउन सत्कार केला! या वेली माजी नगर अध्यक्ष लक्ष्मण राव सिरसट शासकीय गुतेदार उदयसिंह दिखखत माजी नगर अध्यक्ष उतमलाल तोषनीवाल हनुमंत बप्पा नागरगोजे सभापति महादेव राव तोडे उप सभापति सुनील राव शिनगारे राष्ट्रवादी शहर अध्यक्ष नितिन भैया शिनगारे ज्येष्ठ प्रमोद काका तिवारी उप नगर अध्यक्ष बालासाहेब गायकवाड माजी नगर सेवक यशवंतराव गायके माजी सैनिक संघटनेचे अध्यक्ष दत्ताभाऊ शिनगारे यूथ क्लब अध्यक्ष दत्तात्रेय गोरे बाबूभाई मिस्त्री वाइस ऑफ मीडिया चे अध्यक्ष अतुल भैया शिनगारे युवा पत्रकार संघ अध्यक्ष नाथाभाऊ ढगे कांग्रेस तालुका अध्यक्ष सिद्धेश्वर रदवे सर नगर सेवक राजू शेठ कोमटवार कृष्णा शेठ भावठानकर आर पी आय तालुका अध्यक्ष धोंडीराम सिरसट पहाड़ी राजे बालासाहेब चव्हाण ग़ट नेते रोहित हजारी नगर सेवक बालाजी चव्हान नगर सेवक बालासाहेब खामकर नगर सेवक रूपेश चिद्रवार नगर सेवक संतोष बप्पा सीरसट युवा नेते माणिकराव लोखंडे नगर सेवक सुरेश लोकरे माजी तालुका अध्यक्ष एडवोकेट बालासाहेब चोले शहर अध्यक्ष दत्ता भाऊ धोत्रे युवा मोर्चा तालुका अध्यक्ष गणेश बड़े भाजपा युवा मोर्चा शहर अध्यक्ष एडवोकेट मोहन भोसले युवा नेते नदीम मोमिन सोशल मीडियो संयोजक रोहन सिंह हजारी युवा नेते रामप्रभु मुंडे अजयसिंह हजारी तुकाराम महाराज तिडके एडवोकेट नवनाथ पांचाल अंगद मुंडे एडवोकेट साजेद भाई सर्व पत्रकार बांधव व्यापारी बांधव नगर सेवक अजी माजी सैनिक वकील बांधव मान्यवर उपस्थित होते व कार्यक्रम यशस्वी करणयासाठी दीपक पटवर्धन सचिन दुबे संतोषसिंह पवार एजाज भाई रूपेश चिद्रवार एडवोकेट मोहन भोसले रवी शंकर कुभार यानी परिश्रम घेतले व कार्यक्रमचे सूत्र संचलन एडवोकेट मोहन भोसले यानी केले

### राज ठाकरे...

पदाधिकारी उपस्थित होते. यामध्ये बीड जिल्हाध्यक्षा आशा कुटे, जिल्हा उपाध्यक्षा कल्पना कवठेकर, जिल्हा उपाध्यक्ष सदाभाऊ बिडवे, बीड शहराध्यक्ष पठाण अमर जान, शास्त्री कुटे, अभिजीत वैद्य आणि काळजीवाहक छाया यांचा सहभाग होता.कार्यक्रमादरम्यान मोठ्या संख्येने नागरिकांनी उपस्थित राहून सहभाग नोंदवला आणि सामाजिक जाणिवेचा आदर्श घालून दिला.

### राक्षसभुवन (देवीचे)...

या अभ्यासदौऱ्या दरम्यान कृषिदूतांनी शेतकऱ्यांना शेती विषयक शास्त्रीय माहिती, हंगामा प्रमाणे पीक पद्धती, रासायनिक खतांचा योग्य वापर, कीटकनाशके फवारताना घ्यायची काळजी, कीटकनाशक आणि सेंद्रिय शेती याबद्दल माहिती दिली. या अभ्यासदौऱ्याचा कालावधी अडीच महिन्यांचा असून यादरम्यान माती परीक्षण, पाणी व्यवस्थापन, कीडरोग पिक संरक्षण याबाबत प्रात्येक्षिके घेतली जातील. कृषिदूतांचे आगमनावेळी गावचे सरपंच भगवान डफाळ, इतर ग्रामपंचायत सदस्य, ग्रामपंचायत कर्मचारी व ग्रामस्थ उपस्थित होते. या अभ्यासादौऱ्यास विद्यार्थ्यांना आदित्य शिक्षण संस्थेच्या अध्यक्षा डॉ. आदितीजी सारडा यांचे विशेष मार्गदर्शन लाभत आहे. तसेच आदित्य कृषि महाविद्यालयाचे प्राचार्य श्याम भुतडा, कार्यक्रम समन्वय प्रा. वैभव शिंदे, कार्यक्रम अधिकारी डॉ. धनंजय सातपुते, महाविद्यालयातील इतर सर्व प्राध्यापक आणि विषयक तज्ञांच्या मार्गदर्शनखाली हा कार्यक्रम पार पडत आहे.

Daily Marathwada Patra Owner, Printer, published and Editor Dattatray Sakharam Narnale has Printed in Gugladevi, Printers Subhash Road, Malives, Kabad Galli, Beed (Rural) City, Beed Beed 431122 (Maharashtra). Office of Dainik Marathwada Patra Subhash road, Malives, Kabad Galli, Beed Tq- Beed Dist- Beed pin 431122 (Maharashtra) Mo. 9822152955, E-mail- dailymarathwadapatra2021@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com
हे पत्र प्रकाशक मुद्रक व मालक दत्तात्रय सखाराम नरनाळे यांनी गुगळादेवी प्रिंटर्स, सुभाष रोड, माळीवेस, कबाड गल्ली, बीड, ता.जि. बीड – ४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक मराठवाडा पत्र सुभाष रोड, माळीवेस, कबाडगल्ली, बीड ता. जि. बीड – ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. मोबा. ९८२२१५२९५५ संपादक – दत्तात्रय सखाराम नरनाळे, E-mail-marathwadapatra@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com

# आधी हेलिकॉप्टर कोसळलं, त्यानंतर घोटी मार्गावर भीषण अपघात, मृतांचा आकडा गेला १० वर

**संगमनेर**

संडे इज ब्लॅक डे, याचा अर्थ असा की, आजचा दिवस उजाडल्यानंतर देशात विविध ठिकाणी अपघाताच्या घटनांच्या बातम्या समोर आल्या. रविवारी सकाळी उत्तराखंडमधील केदारनाथ धाम येथे झालेल्या हेलिकॉप्टर अपघातात ७ जणांचा मृत्यू झाला आहे. गौरीकुंडजवळून हेलिकॉप्टर जात असताना पहाटे ५.२० वाजता ही घटना घडली. पोलिस, राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद दल (एनडीआरएफ) आणि राज्य आपत्ती प्रतिसाद दल (एसडीआरएफ) च्या पथके तात्काळ घटनास्थळी पोहोचली, मुख्यमंत्री धामी यांनीही या भयानक दुर्घटनेबद्दल तीव्र शोक व्यक्त केला आहे.

एकीकडे ही घटना ताजी असतानाच त्याच्या काही तासांतच महाराष्ट्रातील संगमनेर तालुक्यातील कोल्हार-घोटी राज्य महामार्गावर देखील भीषण अपघात झाला आहे. यामध्ये तीन जणांचा जागीच मृत्यू झाला. तर जखमींची संख्या देखील मोठी आहे.

खासगी बस अन् ट्रकची धडक; तिघे ठार, ८ जखमी- संगमनेर तालुक्यात रविवारी पहाटेच्या सुमारास खासगी ट्रॅव्हल्स बस आणि ट्रकमध्ये




भीषण अपघात झाल्याची बातमी समोर आली आहे. कोकणगाव शिवारातील कोल्हार-घोटी राज्यमार्गावर ही घटना घडली. या अपघातात तिघांचा मृत्यू झाला, तर सात ते आठ जण जखमी झाले आहेत. जखमींना उपचारासाठी नजीकच्या रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. अपघात इतका भीषण होता की, दोन्ही वाहनांच्या पुढील भागाचा चेंदामेंदा झाला.

खासगी ट्रॅव्हल्स जात होते शिर्डीकडे- मिळालेल्या माहितीनुसार, एक खासगी ट्रॅव्हल्स शिर्डीकडे जात होती. कोकणगाव शिवारात निझर्णेश्वर महादेव फाट्याजवळ आल्यानंतर समोरून येणाऱ्या आंब्याची वाहतूक करणाऱ्या एका ट्रकसोबत जोरदार धडक झाली. या अपघातात तिघांचा जागीच मृत्यू झाला असून, सात ते आठ जण जखमी झाले आहेत. अपघाताची भीषणता इतकी होती की, ट्रक आणि ट्रॅव्हल्सच्या पुढील भागाचा अक्षरशः चक्काचूर झाला.

मृत आणि जखमींची अशी आहेत नावे- या भीषण अपघातात प्रवीण सोपान कांदळकर (वय २८, राहणार सुकेवाडी, संगमनेर), फिरोज लाला शेख (वय ४६ राहणार कासारा दुमला, संगमनेर), अंजुम प्रवीण वालमीकी (वय ३९, पानिपत हरियाणा) यांचा मृत्यू झाला आहे. तर हर्षिता सोनु वाल्मीक, पूनम बिर्ला, सोनिया बिर्ला, रिया चावरिया, ऐश्वर्या चंद्रशेखर पाटील, लता सुरेश चक्रनारायण (सर्व राहणार मुंबई), प्रथमेश राजेंद्र कोल्हे (पोहेगाव, ता. कोपरगाव), मोहम्मद रफिक शेख (नाईकवाडापुरा, संगमनेर) हे गंभीर जखमी झाले आहेत. जखमींवर संगमनेर येथील खाजगी रुग्णालयात उपचार सुरु आहेत.

अपघातामुळे वाहतूक ठप्प- घटनेची माहिती मिळताच स्थानिक पोलिस तात्काळ घटनास्थळी दाखल झाले. स्थानिकांच्या मदतीने जखमींना तातडीने उपचारासाठी रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. या अपघातामुळे कोल्हार-घोटी राज्यमार्गावरील वाहतूक काही काळासाठी ठप्प झाली होती, त्यामुळे रस्त्यावर वाहनांच्या लांबच लांब रांगा लागल्या होत्या.

# महाराष्ट्रातील प्रसिद्ध पर्यटनस्थळ असलेल्या माथेरानमध्ये मोठी दुर्घटना; शॉर्लोट तलावात ३ पर्यटक बुडाले

**माथेरान**

पुण्यातील कुंडमळा येथे इंद्रायणी नदीजवळील पूल कोसळून ३ जणांचा मृत्यू झाल्याची दुर्घटना घडली असताना माथेरानमध्ये मोठी दुर्घटना घडली आहे. माथेरान हे महाराष्ट्रातील प्रसिद्ध पर्यटनस्थळ आहे. माथेरानच्या शॉर्लोट तलावात ३ पर्यटक बुडाले आहेत. या घटनेमुळे एकच खळबळ उडाली आहे. पर्यटनस्थळी फिरताना खबरदारी घेणे गरजेचे आहे.



इको पाईंट, मंकी पाईंट, लायन्स पाईंट असे अनेक पाईंट माथेरानमध्ये आहेत. यापैकीच एक आहे ते शॉर्लोट तलाव हा पाईंट. अनेक पर्यटक तलावाजवळ फोटो काढतात तसेच पोहण्याचा आनंद लुटतात. याच शॉर्लोट तलावात तीन पर्यटक बुडाले आहेत. तिघेही पर्यटक नवी मुंबई येथील असल्याची माहिती आहे.

सुमित चव्हाण (१६), आर्यन खोब्रागडे (१९) आणि फिरोज शेख (१९) अशी बुडालेल्या पर्यटकांची नावे आहेत. १० जण पाण्यात पोहण्यासाठी उतरले होते त्यापैकी तिघेजण बुडाल्याची माहिती मिळते आहे. सह्याद्री सेस्क्यू टीम आणि पोलिस यंत्रणा त्या ठिकाणी बचाव कार्य करीत आहे. अन्य बचाव पथकेदेखील घटनास्थळी पोहोचले आहे. पाण्याचा अंदज न आल्याने हे सर्वजण तलावात बुडाल्याची प्राथमिक माहिती समोर आली आहे,. पावसाळ्यामुळे माथेरानमध्ये पर्यटकांची संख्या वाढली आहे. यामुळे माथेरानमधील हॉटेल्स, लॉज आणि इतर पर्यटन स्थळे पूर्णपणे भरली आहेत. पर्यटकांची मोठी गर्दी असल्याने वाहतूक कोंडीची समस्या देखील होत आहे.. माथेरानमध्ये विकेंडसाठी पर्यटकांची मोठी गर्दी होत आहे.

दस्तुरीपासून चांगभल मंदिरापर्यंत वाहनांच्या लांबच लांब रांगा लागल्याचेही पहायला मिळत आहे. वाहतूक कोंडीमुळे पर्यटकांचे हाल होत असून प्रवाशांचा प्रचंड संताप होत आहे. पर्यटक वाहने रस्त्यात सोडून माथेरानकडे चालत जात आहेत.

# पत्नीने पतीची हत्या करुन बॉडीचे केले तुकडे, नाशिक जिल्ह्यातील घटनेने महाराष्ट्र हादरला!

**नाशिक । प्रतिनिधी**

महाराष्ट्रात पतीच्या हत्येचा उलघडा झाला आहे. ही धक्कादायक घटना नाशिक जिल्ह्यातील सुरगाणा तालुक्यात घडली. पत्नीने तिच्या पतीची हत्या करून त्याच्या मृतदेहाचे तुकडे करून घरातील शोषखड्ड्यात टाकून पळ काढला. या घटनेचा उलगडा झाल्यानंतर परिसरात दहशतीचे व भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. नाशिक जिल्ह्यातील सुरगाणा तालुक्यातील मालगोंदा गावात राहणाऱ्या एका महिनेले आपल्या पतीची कुऱ्हाडीने वार करून हत्या केली. हत्या केल्यानंतर तिने तिच्या पतीच्या मृतदेहाचे तुकडे केले व ते एका गोणीमध्ये भरून घरातील



शोषखड्ड्यात तो मृतदेह टाकून तो खड्डा भरून टाकला. यशवंत मोहन ठाकरे असे हत्या झालेल्या व्यक्तीचे नाव आहे.

मृत यशवंत यांच्या आईला वाटले की, आपला मुलगा गेल्या दोन महिन्यांपासून गुजरातमध्ये मजुरी कामासाठी गेला आहे. त्याचा फोन देखील आला नाही किंवा तो देखील अजून का आला नाही, म्हणून यशवंतच्या आई व वडिलांनी सुनेकडे विचारणा केली. मात्र, तिने सासू व सासऱ्याला उडवाउडवीची उत्तरे देणे सुरू केले. दरम्यान, काही दिवसाने सून स्वतः गुजरातच्या बिलीमोरा येथे निघून गेली. त्यामुळे घरच्यांना अधिक संशय बळावला. यशवंत परत न आल्याने त्यांनी अधिक चौकशी करण्याचा प्रयत्न केला. पण काहीच पत्ता लागला नाही. अखेर, यशवंतच्या भावाची पत्नी यशवंतची पत्नी प्रभाला गुजरातमध्ये भेटण्यासाठी गेली. त्यावेळी तिला काहीतरी संशयास्पद वाटले. तिने ही गोष्ट आपल्या नवऱ्याला सांगितली. त्यानंतर तपास सुरू झाला.

# महाराष्ट्रात मान्सूनने जोर धरला, अनेक भागांत ढगफुटीसदृश्य पाऊस, २ जिल्ह्यांना रेड अलर्ट

**मुंबई। प्रतिनिधी**

ब्रेक घेतलेल्या मान्सूनचा आता जोर वाढला आहे. मुंबईसह कोकणात मुसळधार पावसाने हजेरी लावली आहे. रत्नागिरी जिल्ह्यात ढगफुटीसदृश्य पाऊस झाला. तर शनिवारी झालेल्या पावसामुळं राज्यात ९ जणांचा वीज पडून मृत्यू झाला आहे. तर आज पावसाचा रेड अलर्ट देण्यात आला आहे. मुंबईतही विजांच्या कडकडाटासह मध्यम पाऊस होण्याची शक्यता हवामान विभागाने वर्तवली आहे.

कोकण, घाटमाथा आणि मध्य महाराष्ट्रासह राज्यात विविध ठिकाणी मुसळधार पाऊस बरसणार आहे. कोकण आणि घाटमाथ्यावर पावसाचा जोर कायम राहणार आहे. अरबी समुद्रापासून आंध्र प्रदेशाच्या किनाऱ्यापर्यंत हवेचा कमी दाबाचा पट्टा कायम आहे. या मुळं राज्यात पावसाचा पोषक वातावरण निर्माण झाले आहे. त्यामुळं पाच दिवस मुसळधार पावसाचा इशारा देण्यात आला आहे. हवामान खात्याने रविवारी रत्नागिरीला तर सोमवारी सिंधुदुर्गासाठी रेड अलर्ट जारी केला आहे. त्यामुळे या जिल्ह्यांत मुसळधार ते अतिमुसळधार पावसाची शक्यता आहे. तर कोकणातील उर्वरित जिल्ह्यांना ऑरेंज अलर्ट असून आणि मुंबईला यलो अलर्ट आहे.

पालघर, ठाणे, रायगड, सिंधुदुर्ग, पुणे घाटमाथा, सातारा घाटमाथा, कोल्हापूरच्या घाटमाथ्यावर जोरदार पावसाची शक्यता आहे. तर, मुंबई जळगाव, नाशिक, अहिल्यानगर या जिल्ह्यात यलो अलर्ट देण्यात



आला आहे. रायगडसाठी आज रेड अलर्ट- रायगड जिल्ह्यात सर्वच भागात पावसाची रिपरिप सुरू आहे. हवामान खात्याने आजच्या साठी जिल्ह्यात पावसाचा रेड अलर्ट दिलाय. त्यामुळे जिल्हा प्रशासनानं सतर्कतेच्या सूचना दिल्या आहेत. शनिवारी संध्याकाळपासूनच जिल्ह्यात पावसाला सुरुवात झाली. अलिबागसह महाड , पोलादपूर, माणगाव , भागात पाऊस झाल्याचं वृत्त आहे. आज सकाळ पासून सर्वत्र दाट ढगाळ वातावरण असून पावसाची रिप रिप सुरू आहे.

वीज पडून ९ जणांचा मृत्य- छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात वीज पडून दोन सख्ख्या भावांसह चारजणांचा मृत्यू झाला असून ७ जण भाजले आहेत. यश राजू काकडे, रोहित राजू काकडे, रंजना बापूराव शिंदे व शिवराज सतीश गव्हाणे अशी मयतांची नावे आहेत. परभणी जिल्ह्यातील पिंप्राळा येथे वीज पडून माणिक महादराव मिरासे यांचा मृत्यू झाला. धुळे जिल्ह्यातील ताजापुरी नथ्थू हरचंद सनेर तर जळगाव जिल्ह्यात मोहित जगतसिंग पाटील व शांताराम शंकर कठोरे यांचा मृत्यू झाला. तुरखेड (जि. अमरावती) येथील पवन कोल्हे हा मरण पावला आहे.

# आंतरराष्ट्रीय शिवपुराण कथाकर प्रदीपजी मिश्रा यांचे राजकिशोर मोदी यांनी आशिर्वाद घेत त्यांना अंबाजोगाई येथे शिव कथेसाठी येण्याचे निमंत्रण दिले

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

आंतरराष्ट्रीय शिवपुराण कथाकर प्रदीपजी मिश्रा हे वैकुंठवासी गुरुमाऊली ज्ञानेश्वर माऊली महाराज यांच्या पुण्यतिथी निमित्ताने श्रीक्षेत्र चाकरवाडी येथे सात दिवसीय शिवकथा करण्यासाठी आले असतांना अंबाजोगाई शहराचे माजी नगराध्यक्ष राजकिशोर मोदी यांनी प्रदीपजी मिश्रा यांच्या सुमधुर अशा शिवकथेचा आस्वाद घेतला. या शिवकथे दरम्यान राजकिशोर मोदी यांनी प्रदीपजी मिश्रा यांची आशिर्वादपर भेट घेऊन त्यांना अंबाजोगाई शहरात येऊन शिवकथा घेण्याचे निमंत्रण दिले .

दि ८ ते १४ जून या काळात श्रीक्षेत्र चाकरवाडी येथे विसाव्या शतकातील महान संत परमपूज्य वंदनीय ह भ प ज्ञानेश्वर माऊली महाराज यांच्या पुण्यतिथी निमित्ताने आंतरराष्ट्रीय शिव पुराण कथाकर प्रदीपजी मिश्रा यांच्या सुमंगल अशा शिवकथेचे आयोजन करण्यात



आले होते. या शिवकथेसाठी संपूर्ण महाराष्ट्रातुन लाखोंचा जनसमुदाय कथेचा आस्वाद घेण्यासाठी सहभागी झाला होता. या कथेप्रसंगी महाराष्ट्रातुन अनेक थोर संत विभूती , राजकीय नेते हे मोठ्या प्रमाणावर उपस्थित राहिले होते. यामध्ये काशीपीठ येथील मठाधिपती, परमपूज्य शंकराचार्य महाराज यांच्यासह अनेक संत श्रीक्षेत्र चाकरवाडी येथे येऊन उपस्थित शिवप्रेमी तसेच परमपूज्य ज्ञानेश्वर माऊली महाराज यांचे अनुयायी यांना आपले आशिर्वचन दिले. याच शिवपुराण कथे दरम्यानच अंबाजोगाई शहराचे माजी नगराध्यक्ष राजकिशोर मोदी देखील या शिवकथेत सहभागी झाले होते. या भेटीत त्यांनी अंबाजोगाई शहर हे प्राचीन सांस्कृतिक असे शहर असून या शहरात महाराष्ट्राचे आराध्य माता श्री योगेश्वरी देवी, मराठीचे आद्यकवी स्वामी मुकुंदराज यांची समाधी, बुट्टेनाथ डोंगरकडा, दासोपंत यांची पासोडीची ओळख करवून देत या शहराने राज्याला दिलेले अनेक थोर स्वातंत्र्य सैनिक यासह अंबाजोगाई शहराची ओळख असल्याचे प्रदीपजी मिश्रा यांच्या निदर्शनास आणून दिले. त्यांनीही अंबाजोगाई शहराची सांस्कृतिक ओळख जाणून घेतल्यानंतर अंबाजोगाई शहरात शिवकथा घेण्यासाठी येण्यासाठी अनुकूलता दर्शवली.

# 'चळवळ कशी उभी राहते' हे समजून घेण्यासाठी नव्या पिढीने 'सम्यक पांथस्थ आबा' हा ग्रंथ अभ्यासावा : ज्येष्ठ विचारवंत ज.वि.पवार

## प्रा.एस.के.जोगदंड यांच्या जीवनचरित्रावरील गौरव ग्रंथाचे अंबाजोगाईत प्रकाशन

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

एकेकाळच्या दलित युवक आघाडीचे लढाऊ शिलेदार, वंचित बहुजन आघाडीचे जेष्ठ नेते, पुरोगामी परिवर्तनवादी चळवळीतील कार्यकर्त्यांचे प्रेरणास्थान आणि अंबाजोगाई येथील योगेश्वरी शिक्षण संस्थेतील इंग्रजी विषयाचे सेवानिवृत्त प्रा.एस.के.जोगदंड यांच्या जीवनचरित्रावरील 'सम्यक पांथस्थ आबा' या गौरवग्रंथाचा प्रकाशन समारंभ मान्यवरांच्या हस्ते व प्रमुख उपस्थितीत रविवारी शहरातील विलासराव देशमुख न.प.सभागृह, अंबाजोगाई येथे आयोजित करण्यात आला होता.

गौरवग्रंथ प्रकाशन समारंभाच्या अध्यक्षस्थानी डॉ.सुरेश खुरसाळे (माजी अध्यक्ष, योगेश्वरी शिक्षण संस्था.) हे होते. तर गौरवग्रंथाचे विमोचन ज.वि.पवार (ज्येष्ठ



विचारवंत व आंबेडकरी चळवळीचे भाष्यकार, मुंबई.) यांच्या हस्ते व मान्यवरांच्या प्रमुख उपस्थितीत रविवार, दिनांक ८ जुन रोजी करण्यात आले. तसेच यावेळी गौरवग्रंथावर भाष्यकार म्हणून बोलताना प्रसिद्ध साहित्यिक प्रा.डॉ.प्रल्हाद लुलेकर (छत्रपती संभाजीनगर) यांनी सांगितले की, प्रा.एस.के.जोगदंड यांच्यासारखा विद्यार्थीभिमुख प्राध्यापक आता होणे नाही. समाजासाठी आबांनी मोठा त्याग केला असे प्रा.डॉ.लुलेकर म्हणाले. तर सामाजिक कार्यकर्त्या मंगलताई खिंवसरा (छत्रपती संभाजीनगर) यांनी आबांच्या यशस्वी वाटचालीत त्यांच्या सुविद्य पत्नी सुधाताई यांचे ही मोठे योगदान आहे असा त्यांचा गौरवपूर्ण उल्लेख केला. यावेळी डॉ.बाबासाहेब आंबेडकर चरित्र साधने समितीचे माजी सदस्य प्रा.पी.जी.जोगदंड (मुंबई) यांनी आपल्या भाषणात आबांचे कार्य, त्याग, समर्पण आणि जीवनमूल्ये जपत केलेला संघर्षमय प्रवास उलगडला. आबांनी अनेक विद्यार्थी घडवले. जे आज मोठ-मोठ्या पदांवर कार्यरत आहेत. चळवळ पुढे नेण्यासाठी समाजात आता दुसरे 'आबा' तयार झाले पाहिजेत अशी अपेक्षा प्रा.जोगदंड यांनी व्यक्त केली. यावेळी आबांच्या सुविद्य पत्नी सुधाताई जोगदंड, पत्रकार सुरेश पाटील (छत्रपती संभाजीनगर) तसेच प्रा.एस.के.जोगदंड यांनीही आपले समायोचित मनोगत व्यक्त केले. यावेळी बोलताना ज्येष्ठ विचारवंत ज.वि.पवार यांनी 'चळवळ कशी उभी राहते, परिवर्तनाची लढाई कशी लढली जाते आणि चळवळीचे फलित कसे मिळवले जाते.' हे जाणून घेण्यासाठी नव्या पिढीतील कार्यकर्त्यांनी 'सम्यक पांथस्थ आबा' हा ग्रंथ जरूर वाचावा, अभ्यासावा असे आवाहन पवार यांनी उपस्थितांना केले. अध्यक्षीय समारोप करताना डॉ.सुरेश खुरसाळे म्हणाले की, प्रा.एस.के.जोगदंड यांच्यासारख्या प्राध्यापक, कार्यकर्त्याची गरज काल ही होती. पण, कालच्या पेक्षा आज जास्त आहे. एकिकडे प्राध्यापक म्हणून काम करताना प्रा.जोगदंड सरांनी विद्यार्थ्यांना शिकवत त्यांच्या प्रश्नांची सोडवणूक ही केली. तसेच दुसरीकडे एक कार्यकर्ता म्हणून त्यांनी चळवळ ही उभी केली. त्यामुळे विद्यार्थी, कार्यकर्ते आणि युवकांसाठी 'सम्यक पांथस्थ आबा' हा गौरवग्रंथ प्रेरक आणि दिशादर्शक ठरेल असा विश्वास डॉ.खुरसाळे यांनी व्यक्त केला. प्रारंभी मान्यवरांनी तथागत गौतम बुद्ध आणि महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस अभिवादन केले. आयोजकांनी मान्यवरांचे स्वागत केले. बोधिघाट महिला मंडळाने 'अतिथी हा जयभीम घ्यावा' हे स्वागतपर गीत सादर केले. वंचित बहुजन आघाडीकडून ज्येष्ठ विचारवंत ज.वी.पवार यांचा सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ.वाल्मिक सरवदे (प्र.कुलगुरू, डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर) यांनी केले. तर सुत्रसंचालन माजी मुख्याध्यापक लंकेश वेडे यांनी करून उपस्थितांचे आभार सुखदेव भुंबे यांनी मानले. प्रा.एस.के.जोगदंड यांच्या जीवनचरित्रावरील 'सम्यक पांथस्थ आबा' या गौरवग्रंथाचे संपादन ज्येष्ठ पत्रकार तथा माध्यम तज्ज्ञ प्रा.जयदेव डोळे, मंगलताई खिंवसरा, ज्येष्ठ संपादक प्रा.नानासाहेब गाठाळ, माजी मुख्याध्यापक लंकेश वेडे, मुक्त पत्रकार अमर हबीब, डॉ.वाल्मिक सरवदे, सुरेश पाटील, राम दोतोंडे यांनी केले आहे. तर गौरवग्रंथ समिती मध्ये ज.वि.पवार, शांताराम पंदेरे, डॉ.सुरेश खुरसाळे, डॉ.साहेबराव गाठाळ, अण्णा खंदारे, अशोक देशमुख, चंद्रशेखर बर्दापूरकर, वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठाचे कुलसचिव प्राचार्य डी.ए.चव्हाण, सुखदेव भुंबे, उपप्राचार्य गौतम गायकवाड, डॉ. नरेंद्र काळे, प्रा.अरूंधती पाटील, प्रा.माणिक कांबळे, रमेशभाई खंडागळे, रामभाऊ पेरकर या मान्यवरांचा समावेश होता. यावेळी सभागृहात ॲड.श्यामभाऊ तांगडे, डॉ.कमलाकर कांबळे,

दैनिक मराठवाडा पत्र
epaper.marathwadapatra.com
सोमवार, दि.१६ जून २०२५


## नाळवंडीसह ग्रामीण रस्ते कामांसाठी नियोजित आजचे रास्ता रोको आंदोलन तात्पुरते स्थगित



बीड । प्रतिनिधी

तालुक्यातील नाळवंडी (ता. बीड) येथील मौज ते नाळवंडी (व्ही. आर. नं. २४३) या रस्त्याचे काम रस्ते सुधारणा योजनेअंतर्गत मंजूर झाले असले तरी, सहा महिन्यांनंतरही प्रत्यक्ष काम सुरू झालेले नाही. अशी बीड तालुक्यातील ग्रामीण भागातील अनेक कामे आहेत. ही सर्व कामे स्थानिक लोकप्रतिनिधींच्या अडथळ्यांमुळे रखडली असून, ग्रामपंचायतीने याविरोधात जरुड फाटा (ता.बीड) येथे सोमवारी (दि.१६) रास्ता रोको आंदोलनाची हाक दिली होती. मात्र प्रशासनाकडून लेखी ▶▶ उर्वरित पान २ वर

# नगरपरिषदेच्या वतीने बिंदुसरा नदी किनारी वृक्षारोपण करणार : पटेल, नाईकवाडे

बीड । प्रतिनिधी

बीड शहरातील बिंदुसरा नदी परिसरामध्ये अनेक प्रकारचा कचरा आणि वेगळी झाडे उगवल्यामुळे बिंदुसरा नदी परिसर अस्वच्छ आणि विद्रूप झाला होता. पावसाळ्यातील संभाव्य धोका लक्षात घेऊन नगर परिषदेतील गटनेते फरक पटेल आणि माजी नगरसेवक अमर नाईकवाडे यांनी नगरपरिषेच्या मुख्याधिकारी अंधारे मॅडम यांची भेट घेऊन बिंदूसरा नदी परिसर स्वच्छ करून त्या परिसरात बांबू सारख्या झाडांची लागवड करावी अशी मागणी केली होती. या मागणीची दखल घेत मुख्याधिकारी अंधारे मॅडम यांनी बिंदुसरा नदी



**• बिंदुसरा नदीच्या दुतर्फा सुशोभीकरणाकरिता पालकमंत्री अजितदादांची भेट घेणार...**

**बिंदुसरा नदी शेजारील मोंढा रोड ते जैन भवन यासह या भागात सुशोभीकरण करण्याकरिता अमर नाईकवाडे व फारूक पटेल हे प्रस्ताव दाखल करणार आहेत. या कामी माजी मंत्री धनंजयजी मुंडे व माजी आमदार अमरसिंहाजी पंडित यांच्या माध्यमातून अजितदादांची भेट घेणार असल्याचेही नगरसेवक अमर नाईकवाडे व गटनेते फरक पटेल यांनी कळविले आहे.**

परिसर स्वच्छ्ता मोहीम हाती घेतली.

या स्वच्छता मोहिमेमुळे बिंदुसरा नदीने मोकळा श्वास घेतला आहे. या परिसरातील स्वच्छता निर्माण झाली. या स्वच्छता म ोहिमेची स्वतः मुख्याधिकारी अंधारे मॅडम यांनी पहाणी केली.

बीड शहराच्या मध्यवर्ती भागातून बिंदूसरा नदी वाहत आहे. मागील काही दिवसापासून बिंदुसरा नदी परिसर आणि नदीच्या प्रचंड अस्वच्छता निर्माण झाली आहे. कचरा, अस्वच्छता निर्माण झालेली असताना या परिसरात अनावश्यक गवत आणि विविध प्रकारचे झाडे उगवली आहेत. त्यामुळे बिंदुसरा नदी परिसर विद्रूप आणि अस्वच्छ झाला आहे. त्यातच नदी परिसराच्या जवळ राहणारे नागरिक कचरा टाकत असल्यामुळे या परिसरात दुर्गंधी आणि अस्वच्छता म ोठ्या प्रमाणात निर्माण झाली आहे. संभाव्य पावसाळी धोका लक्षात घेऊन माजी नगरसेवक अमर नाईकवाडे आणि फारूक पटेल यांनी नगरपरिषेच्या मुख्याधिकारी अंधारे मॅडम यांची भेट घेऊन बिंदुसरा नदी शेजारील मोंढा रोड कडून श्री संत ▶▶ उर्वरित पान २ वर

# पोलीस निरीक्षक अशोक मुदिराज यांची गुटखा माफियावर कारवाई !

**• एक लाख ३९ हजार रुपयाचा मुद्देमाल जप्त**

बीड । प्रतिनिधी

पेठ बीड पोलीसांची अवैद्य धंद्यावर कार्यवाही -गुटखा ठेवणारा व त्याची चोरटी विक्री करणारा यांचेवर छापा मारला असता १,३९,०१७/- रू.चा मुद्येमाल जप्त

पेठ बीड पोलीस ठाणेचे पोलीस निरीक्षक अशोक मुदिराज गोपनिय माहिती मिळाली की, भुईगल्ली या ठिकाणी मयत नामे वाजेद हसन बागवान रा. भूईगल्ली यांचे घरात, घर भाडयाने करून घरात गोवा, आर.एम.डी., राजनिवास तंबाखू, बाबा, हिरा, विमल असा वेगवेगळ्या




प्रकारचा गुटखा ठेवणारा व त्याची चोरटी विक्री करत आहे. अशी खात्री लायक माहिती मिळाल्यावरून आम्ही सोबत पोलीस निरीक्षक अशोक मुदिराज व सोबत पोह १६१३ रमेश, पोअं/१९६१ अल्ताफ, चालक पोअ/२१८० अनिल यांनी भोई गल्ली येथे मयत वाजेद हसन बागवान रा. भूईगल्ली येथे शेख खदीर शेख बशीर, शेख अरसलान शेख खदीर असे गुटखा ठेवून त्याची विक्री करत आहेत व ठेवत आसल्याने सदर ठिकाणी छापा मारला असता वर नमूद वर्णनाचा गुटखा जागीच टाकून वर नमूद आरोपी पोलीस पार्टीस पाहून पळून गेल्याने त्यांचेवर पोलीस ▶▶ उर्वरित पान २ वर

# संतोष देशमुख हत्या प्रकरण; वैभवी आणि धनंजय देशमुख यांचे ठिय्या आंदोलन स्थगित

बीड । प्रतिनिधी

संतोष देशमुख हत्या प्रकरणातील फरार असलेला आरोपी कृष्णा आंधळे याला तात्काळ अटक करावी. यासह जेरबंद असलेल्या आरोपींना मदत आणि रसद पुरवणाऱ्यांची नावे जाहीर करावीत, त्यांच्यावर गुन्हा दाखल करावा, यासाठी उद्या म्हणजेच सोमवार १६ जून रोजी आंदोलन करण्यात येणार होतं. मात्र वैभवी देशमुख आणि धनंजय देशमुख यांचे हे ठिय्या आंदोलन तूर्तास स्थगित करण्यात आल्याची माहिती समोर आली आहे.



दरम्यान, शाळा सुरू होण्याचा पहिला दिवस आणि पेरणीचा काळ असल्याने कोणालाही त्रास होऊ नये, म्हणून हे आंदोलन स्थगित करण्यात आल्याची माहिती आता समोर आली आहे. त्यामुळे सोमवारी होणारे ठिय्या आंदोलन तूर्तास तरी पुढे ढकलण्यात आले आहे. संतोष देशमुख हत्या प्रकरणातील अनेक मुद्यांवरून देशमुख कुटुंबिय, मस्साजोग ग्रामस्थ सोमवारी रास्ता रोको आणि ठिय्या आंदोलन करणार होते. फरार आरोपी कृष्णा आंधळे ला तात्काळ अटक यासह अनेक मागण्यासाठी हे आंदोलन होणार होतं. आता पुन्हा एकदा देशमुख कुटुंबीय आणि ग्रामस्थ सोमवारी रास्ता रोको आंदोलन करणार होते. मात्र शाळा सुरू होण्याचा पहिला दिवस आणि पेरणीचा काळ असल्याने कोणालाही त्रास होऊ नये, म्हणून हे आंदोलन स्थगित करण्यात आलं आहे. तर ▶▶ उर्वरित पान २ वर

## वाचाल तर वाचाल वाचनालयातर्फे साहित्य वाटप करून गुणवंताचा सत्कार संपन्न




बीड । प्रतिनिधी

**ध्येय निश्चिती करून जिद्द, चिकाटी, प्रयत्नांची पराकाष्टा व गुरुजनांच्या मार्गदर्शनाने, पालकांच्या कष्टाची जाण ठेवून केलेल्या अभ्यासातून यश नक्की मिळते : प्रा डॉक्टर उत्तमराव साळवे**

जीवनात यशस्वी व्हावयाचे असेल तर लहानपणीच ध्येय निश्चिती करून जिद्द, चिकाटी, प्रयत्नांची पराकष्ठा व गुरुजणांच्या मार्गदर्शनाने, पालकांच्या कष्टाची जाण ठेवून केलेल्या अभ्यासातून यश नक्की मिळते, उपप्राचार्य प्रा. डॉक्टर उत्तमराव साळवे यांनी महामानव अभिवादन ग्रुप संचलित मोफत शिकवणी वर्ग जुना मोंढा रोड बीड राजगृह बुद्ध विहार येथे वाचाल तर वाचाल या फिरत्या मोफत वाचनालयाने आयोजित केलेल्या गुणवंत विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वही पेन वाटप प्रसंगी विद्यार्थी व पालकाशी संवाद साधताना अध्यक्षपदावरून प्रतिपादन केले. ते पुढे म्हणाले ▶▶ उर्वरित पान २ वर

## शासनाने बांधकाम कामगारांना देण्यात येणाऱ्या विविध योजना सह त्यांच्या किमान वेतणात वाढ करावी: बाबुराव पोटभरे

**नोंदणीकृत बांधकाम कामगारांनी कल्याणकारी योजनांचा लाभ घ्यावा आम्ही पाठपुरावा करू: परमेश्वर सोळके, शेख हमीद**

माजलगाव । प्रतिनिधी

महाराष्ट्र शासन बांधकाम कामगारांना विविध योजना आणत आहे याचा फायदा बांधकाम कामगारांना होत आहे मात्र त्यांना मिळणाऱ्या तुटपुंज्या वेतणावर ही शासनाने तात्काळ विचार करावा असे मत बहुजन विकास मोर्चा चे



संस्थापक अध्यक्ष मा. बाबुरावजी पोटभरे यांनी व्यक्त केले ते महाराष्ट्र बांधकाम कामगार संघटना आयोजित बांधकाम कामगारांना गृहउपयोगी साहित्य किट वाटप प्रसंगी बोलत होते. माजलगाव येथील व्यंकटेश हॉटेल येथे आज ▶▶ उर्वरित पान २ वर

## चतुर्थी निमित्त श्रीसिद्धिविनायक गणपती मंदिर यशवंत नगर बीड येथे गायत्री यज्ञसंपन्न

बीड । प्रतिनिधी

गायत्री परिवार हरिद्वार शाखा बीड यांच्या वतीने काल दिनांक १४/५/२५ शनिवारी संकष्टी चतुर्थी निमित्तगायत्री यज्ञाचे आयोजन केले होते. यजमान सतीश काकासाहेब पोकळे व परीवार हे होते. यावेळी गायत्री यज्ञामध्ये अहमदाबाद येथे झालेल्या एअर इंडिया विमान दुर्घटनेतील मृतांच्या आत्मा शांतीसाठी मंत्रोच्चार व त्यांच्या आत्म्यास शांती मिळण्यासाठी यज्ञामध्ये ५ आहुती देण्यात आल्या. यज्ञाचे पुरोहित म्हणून ह भ प मोहन महाराज खरमाटे, रत्नपारखी महाराज व गायकवाड ताई यांनी केले. या कार्यक्रमाला विशेष सहकार्य विलास लेंभें, मुकुंद भूतपल्ले, मेहत्रे साहेब ,बोरा शेठ यांचे लाभले. यावेळी भाविक भक्त उपस्थित होते.

## जागतिक रक्तदान दिन व कै.कॅराजपालसिंह हजारी भैय्या यांच्या पुण्यतिथी निमीत्त भव्य रक्तदान शिबीराचे व आजी माजी सैनिक यांचा सनमान सत्कार कार्यक्रम आयोजन

**१३६ रक्तदात्यांनी केले रक्तदान**

किल्ले धारूर । प्रतिनिधी

जागतीक रक्तदाता दिन व कै. कॅराजपालसिंह हजारी यांच्या २८ व्या पुण्यतिथी निमीत्त प्रतिवर्षी प्रमाणे या वर्षी ही भव्य रक्तदान शिबीराचे आयोजन करण्यात आले व आजी माजी



सैनिक यांचा सत्कार करण्यता आला. व जम्मू कश्मीर या ठिकानी पहेलगाम येथे दहशतवाद्यानी भ्याड हल्ला केला होता, या ठिकानी २६निष्पाप लोकाची हत्या केली होती व अहमदाबाद या ठिकानी काल विमान अपघातात २४२ लोक मरण पावले या सर्वाना श्रद्धांजलि अर्पण करण्यता आली प्रस्ताविकमध्ये बालाघाट प्रतिष्ठान चे अध्यक्ष व नगर अध्यक्ष डॉ स्वरुपसिंह हजारी साहेब यानी बालाघाट प्रतिष्ठान विषयी कार्य ची माहिती दिली वऑपेरेशन सिंदूर * या विषई माहिती दिली!अजी माजी सैनिक यांचा सनमान करने हे आपले कर्तव्य आहेआहे असे सांगितले! म्हणून आजी-माजी सैनिक, सिमा सुरक्षा दलाच्या ▶▶ उर्वरित पान २ वर

# राज ठाकरे यांचा वाढदिवस अनोख्या पद्धतीने साजरा;

## जिव्हाळा बेघर निवारा केंद्रात अन्नदान, केक आणि वृक्षारोपण

### देवाने आम्हाला तुमची सेवा करण्यासाठी निवडलं, हेच आमचं खरं भाग्य : वर्षा जगदाळे

बीड । प्रतिनिधी

महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे पक्षप्रमुख राज ठाकरे यांचा वाढदिवस यंदा खास पद्धतीने साजरा करण्यात आला. बीडम धील जिव्हाळा बेघर निवारा केंद्रात राज्याच्या उपाध्यक्षा वर्षा जगदाळे यांच्या वतीने हा वाढदिवस अनाथ



व बेघर नागरिकांसोबत साजरा करण्यात आला.

या कार्यक्रमात अन्नदान करण्यात आले आणि गरजू नागरिकांना भरपेट जेवण दिले गेले. यानंतर परिसरात वृक्षारोपण करून पर्यावरण संरक्षणाचा संदेश देण्यात आला. राज ठाकरे यांच्या प्रतिमेसमोर केक कापून उपस्थितांमध्ये वाटप करण्यात आले आणि वाढदिवसाचा आनंद सर्वांसोबत सामायिक करण्यात आला.दरवर्षीप्रमाणे यंदाही वर्षाताई जगदाळे यांनी सामाजिक बांधिलकी जपत जिव्हाळा बेघर निवारा केंद्रात विविध उपक्रम राबवले. त्या या केंद्रातील बेघर, गरजू लोकांच्या मदतीस नेहमीच तत्पर असतात. वाढदिवसाच्या निमित्तानेही त्यांनी या परंपरेला पुढे नेत आपुलकीची भावना जोपासली. या कार्यक्रमाला बीड जिल्ह्यातील अनेक मान्यवर ▶▶ उर्वरित पान २ वर

## राक्षसभुवन (देवीचे)गावात सरपंच व ग्रामस्थांकडून कृषि दुतांचे स्वागत

बीड । प्रतिनिधी

वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी संलग्नित व आदित्य शिक्षण संस्था, बीड संचलित आदित्य कृषि महाविद्यालयाचे कृषिदूत अमेय गावंडे , स्वप्निल वाघमोडे, विशाल गरुड, सौरव शेंडे, गणेश जंजिरे, धीरज तायनाक, गौरव खराडे, महेश गडदे विश्र्वतेज दुपडे , हरी जंगमवार यांचे ग्रामीण कृषि कार्यानुभव आणि कृषि औद्योगिक संलग्नता उपक्रम २०२५-२६ च्या अभ्यास दौऱ्यानिमित्त राक्षसभुवन( देवीचे ) या गावामध्ये आगमन झाले. राक्षसभुवन( देवीचे) येथील सरपंच व ग्रामस्थांनी कृषिदूतांचे स्वागत केले.

▶▶ उर्वरित पान २ वर

